# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी - २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१, फॅक्स - २६९२१०२.

तार — EDUTECH E-mail : desk16@dte.org.in Internet :http/www.dte.org


क्रमांक : १६/आस्था/संकीर्ण/२०१२/शा२८५२९

दिनांक : ५।१०।२०१२

प्रति,

१. सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर.

२.सचिव,
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ,
मुंबई.

**विषय :- माहितीचा अधिकार अधिनियमांच्या कलम २०(१) अन्वये शास्ती संदर्भात कार्यवाही करण्याबाबत...**

उपरोक्त विषयाबाबतचे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे क्रमांक माअअ २०१२/प्र.क्र.६९-२०१२/आस्था-२, दिनांक १५/९/२०१२ चे पत्र सहपत्रांसह सोबत जोडत आहे.

सदर प्रकरणी आपणांस कळविण्यात येते की, वरील पत्रान्वये शासनस्तरावरून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) मधील तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यांवर बजावलेली शास्ती ताबडतोब वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. सदर सर्व सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व संस्था / कार्यालय प्रमुखांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

सहसंचालक तंत्र शिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, अमरावती
जावक क्र.६२९९ दिनांक २६।१०।२०१२

( दयानंद मेश्राम )
सहसंचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई.

प्रत : कार्यासन अधिकारी, सर्व कार्यासने, तंत्र शिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

प्रतिलिपी — सहपत्र ... ५-९-१२ ... ८-९-१२ ...
(१) प्राचार्य ... महाविद्यालय, अमरावती / ... अमरावती.
(२) प्राचार्य ... अमरावती ...
प्राचार्य डॉ. पंजाबराव देशमुख ... अमरावती.
प्राचार्य ... अकोला.

सहसंचालक
तंत्र शिक्षण अमरावती

# महाराष्ट्र शासन

**क्रमांक : माअअ २०१२/प्र.क्र.६९-२०१२/आस्था-२**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १५.९.२०१२

**प्रति,**

**सर्व सहसचिव / उपसचिव,**
**आयुक्त** (व्यवसायप्रशिक्षण), **संचालक** (उच्चशिक्षण /तंत्रशिक्षण /व्यवसायशिक्षण /कला /ग्रंथालय),
**कुलसचिव** (सर्व अकृषीक विद्यापीठे),
उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
महाराष्ट्र शासन.

**विषय :** माहितीचा अधिकार अधिनियमंच्या कलम २०(१) अन्वये
<u>**शास्ती संदर्भात** कार्यवाही करण्याबाबत...</u>

%

सोबत, उपरोक्त विषयाबाबतचे अपर मुख्य सचिव (रवका), सामान्य प्रशासन विभाग यांचे पत्र क्रमांक संकीर्ण २०१२/८०५/ प्र.क्र.३८१/६, दिनांक ४.९.२०१२ (सहपत्रासह) जोडले आहे.

सदरचे पत्र स्वयंस्पष्ट असून, माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २०(१) मधील तरतुदीनुसार माहिती अधिकाऱ्यांवर बजावलेली शास्ती ताबडतोब वसूल करण्यासंदर्भात तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत. सदर सर्व सूचना आपल्या अधिपत्याखालील सर्व प्रादेशिक विभाग प्रमुख / विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांच्या निदर्शनास आणण्यात याव्यात.

**( बा. म. राऊत )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

आपण आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यां सूचना द्याव्यात ही विनंती.

आपणास असेही कळविण्यात येते की, ज्या ज्या वेळी आपणास वरीलप्रमाणे शास्ती लावण्याचे / वसूलीचे आदेश माहिती आयोगाकडून प्राप्त होतील त्यावेळी लगेच असे आदेश संबंधितांना पाठवून वसूली संदर्भात आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना आपल्या अधिपत्याखालील प्रादेशिक विभाग प्रमुख, विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना द्याव्यात अशी ही विनंती.

सोबत-वरीलप्रमाणे

आपला, विश्वासु

पीएस मीना

**( डॉ.पी.एस.मीना )**
**अपर मुख्य सचिव (र. व का.)**

प्रत-

प्रभारी सचिव, राज्य माहिती आयोग यांना अ.शा.प.क्र.मुमाआ/अपिल/शास्ती २०१२, दि.१७/८/२०१२ च्या संदर्भात माहितीसाठी अग्रेषित

गायकवाड
माहिती आयुक्त

दूरध्वनी क्रमांक : ०२२-२२८५ ६० ७८
फॅक्स क्रमांक : ०२२-२२०४ ९३ ९०
E-mail : ratnakargaikwad@hotmail.com

१३ वा मजला
नवीन प्रशासकीय इमारत
मंत्रालयासमोर, मादाम कामा रोड
मुंबई ४०० ०३२

दिनांक :

अ.शा प क्र.मुमाआ/अपील/शास्ती/२०१२

दिनांक १७ ऑगस्ट २०१२

प्रिय श्री. मीना

माहितीचा अधिकार अधिनियमाच्या कलम २०(१) अन्वये ज्या प्रकरणात जन माहिती अधिकारी हे आपले कर्तव्य नीट बजावित नाहीत व माहिती देण्यास टाळाटाळ करतात तसेच चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देतात, त्यांच्या विरुध्द शास्ती लादण्याची तरतूद माहितीचा अधिकार अधिनियमात आहे. आयोगाने आतापर्यंत सुमारे १७४९ प्रकरणामध्ये शास्ती लावली असून, याबाबतची प्रत्यक्ष वसूली मात्र योग्य रितीने होत नसल्याचे दिसून आले आहे.

यासाठी आयोगाच्या निर्णयानुसार आता, प्रत्येक शास्तीच्या आदेशाची प्रत संबंधित विभाग प्रमुखांना दिली जाते कारण संबधित अधिकारी व कर्मचारी यांच्या वेतनातून शास्तीच्या रक्कमेची वसूली करणे ही सर्वस्वी जबाबदारी त्या त्या विभाग प्रमुख यांची राहील.

आपणांस विनंती करण्यांत येते की,याबाबतच्या स्वयंस्पष्ट सूचना राज्यातील सर्व विभाग प्रमुखांना देण्यांत याव्यात.

सस्नेह

आपला

(रत्नाकर गायकवाड)

श्री.पी.एस.मीना
प्रधान सचिव
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय,मुंबई